॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## जनसंपर्क विभाग

जळगाव (प्रतिनिधी) दि. २६ : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या 'बौद्धिक संपदा हक्क' विभागामार्फत 'पारंपरिक ज्ञान संवर्धन आणि नवसंशोधनासाठी बौद्धिक संपदा हक्क' या विषयावर २६ फेब्रुवारी रोजी एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. प्र-कुलगुरू प्रा. एस.टी. इंगळे यांच्या हस्ते या राष्ट्रीय चर्चासत्राचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी मंचावर भौगोलिक मानांकन क्षेत्रातील तज्ञ् ॲड. गणेश हिंगमिरे (पुणे), लेखिका प्रा. मृदुला बेले (नाशिक), बौध्दीक संपदा हक्क केंद्राचे प्राध्यापक डॉ. डी.जी. हुंडीवाले, रसायनशास्त्र प्रशाळेचे संचालक प्रा.दीपक दलाल, समन्वयक प्रा.विकास गीते उपस्थित होते.

भौगोलिक मानांकन क्षेत्रातील तज्ञ् ॲड. गणेश हिंगमिरे (पुणे) यांनी सांगितले की, जळगावची केळी, जळगावचे भरीत वांगे आणि नवापूर तूरडाळ या खान्देशातील तीन उत्पादनांना बौध्दीक संपदेच्या माध्यमातून भारतात वेगवेगळया राज्यात प्रसिध्दी मिळू शकते व येथील उद्योगधद्यांना प्रोत्साहन मिळू शकते. तसेच आपल्या भागातील शेतकऱ्यांना या पारंपारीक व्यवसायातून समृध्द करता येईल हे महत्वाचे आहे. उत्पादनांना जर भौगोलिक मानांकन प्राप्त होऊ शकले तर त्याद्वारे उत्पादकांना मोठ्या प्रमाणावर आर्थिक फायदा होऊ शकतो.

लेखिका प्रा. मृदुला बेले (नाशिक) यांनी बौध्दीक संपदेचा विषय हा ग्रामीण भागापर्यंत पोहचणे आवश्यक आहे. जगभरात बौध्दीक संपदेचे ज्ञान हे मराठीतून दिल्यास हे ज्ञान तळागळापर्यंत पोहचेल असे त्या म्हणाल्या.

प्र-कुलगुरू प्रा. एस.टी. इंगळे यांनी अध्यक्षीय भाषणात सांगितले की, खान्देश परिसरातील पारंपरिक ज्ञान, जैवविविधता आणि स्थानिक कौशल्ये यातून जास्तीत जास्त प्रमाणात भौगोलिक मानांकन नोंदणी होण्यासाठी या चर्चासत्राचा फायदा होणार आहे. या नवउद्योजकांनी त्यांची उत्पादने व उत्पादन पद्धती यांचे स्वामित्व हक्क (पेटंट), कॉपीराईट, व्यापार चिन्हे, व्यापार गुपिते इत्यादी प्रकारच्या बौद्धिक संपदा हक्कांनी सुरक्षित करून ठेवल्यास त्याद्वारे त्यांची औद्योगीक भरभराट होऊ शकते.

या परिषदेचे समन्वयक प्रा. विकास गीते यांनी प्रास्ताविकात बौध्दीक संपदा कक्षाकडून ८३ पेटंटची नोंदणी केली त्यापैकी ३२ पेटंट मान्य झालेले आहेत असे सांगितले. डॉ. सारंग बारी यांनी सूत्रसंचालन केले तर डॉ.लिना जाधार यांनी आभार मानले.

उद्घाटन सत्रानंतर सुप्रसिद्ध लेखिका प्रा. मृदुला बेले (नाशिक) यांनी बीजभाषण केले. ॲड. गणेश हिंगमिरे (पुणे) यांनी प्रोटेक्शन ॲण्ड एनफोर्समेंट ऑफ जीआय ऑफ इन इंडिया या विषयावर व्याख्यान दिले. दीपंकर रॉय (नवी दिल्ली) यांनी भारतीय ज्ञान पध्दती या विषयावर व्याख्यान दिले. बौद्धिक संपदा हक्क तज्ज्ञ डॉ. खुशबू भुरट (पुणे) यांनीरिसेंट ॲडव्हान्सेस इन पेटंटींग या विषयावर, श्री.संदीप सिंघल (नवी दिल्ली) यांनी आयपीआर क्षेत्रातील व्यवसाय संधी, तर हाराष्ट प्रा. प्रकाश चौधरी (मुंबई) यांनी कॉपीराईट फॉर ॲकेडेमिया या विषयावर व्याख्यान दिले.

व्य.प.सदस्य प्रा. जे.व्ही. साळी व प्रा.डी.जी. हुंडीवाले यांच्या अध्यक्षतेखाली समारोप संपन्न झाला. त्यावेळी चर्चासत्रातील सहभागींकडून मनोगते व्यक्त करण्यात आली. मयुर पाटील यांनी आभार मानले.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: २६ फेब्रुवारी, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## जनसंपर्क विभाग

जळगाव (प्रतिनिधी) दि. २६ : विद्यार्थ्यांनी केवळ उच्च पगाराच्या मागे न लागता प्रामाणिकपणे आपल्या कामात स्वतःला झोकून दिल्यास दीर्घकालीन यश मिळते, असे प्रतिपादन फेरो ऑइल्टेक प्रा. लि., ठाणे येथील कार्यकारी संचालक तथा विद्यापीठातील रसायन तंत्रज्ञान संस्थेचे माजी विद्यार्थी जेनेद्र बोहरा यांनी केले. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील रसायन तंत्रज्ञान संस्था (UICT) तर्फे आयोजित 'ओपन हाऊस २०२६' कार्यक्रमच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते.

कार्यक्रमाचे अध्यक्ष रसायन तंत्रज्ञान संस्थेचे संचालक डॉ. ए. के. गोस्वामी, अधिसभा सदस्य दिनेश चव्हाण, आयसीआयसीआय बँकेचे व्यवस्थापक योगेश पाटील, ओपन हाऊसचे समन्वयक डॉ. भुषण चौधरी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

यावेळी मनोगत व्यक्त करताना जेनेद्र बोहरा यांनी आपल्या विद्यार्थी जीवनातील आठवणींना उजाळा देत संस्थेतील शिक्षणपद्धती, प्राध्यापकांचे मार्गदर्शन आणि मिळालेल्या संधींचे विशेष महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी आपल्या सर्व शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त करत विद्यार्थ्यांनी उद्योग क्षेत्रातील बदलत्या गरजांशी जुळवून घेत कौशल्यविकासावर भर द्यावा, असे आवाहन केले. यावेळी त्यांनी रसायन तंत्रज्ञान संस्थेचे माजी संचालक व मुंबई विद्यापीठचे कुलगुरू डॉ. आर. डी. कुलकर्णी यांच्या स्मरणार्थ तीन पुरस्कार जाहीर करण्याची महत्त्वपूर्ण घोषणा केली.

अध्यक्षीय भाषणात डॉ. ए. के. गोस्वामी यांनी संस्थेच्या स्थापनेपासून आजपर्यंतच्या वाटचालीचा आढावा घेतला. त्यांनी UICT ने संशोधन, उद्योगसहभाग आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या क्षेत्रात केलेल्या प्रगतीचा उल्लेख करत भविष्यात अधिक नावीन्यपूर्ण उपक्रम राबविण्याचा संकल्प व्यक्त केला. यावेळी अधिसभा सदस्य दिनेश चव्हाण यांनीही विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. भुषण बाळू चौधरी यांनी करत 'ओपन हाऊस २०२६' मागील संकल्पना स्पष्ट केली. या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना उद्योग क्षेत्रातील संधी, प्रकल्प सादरीकरण आणि संवादाचे व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पूर्वा बाम्हणकर व आदिती महाजन यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रतीक्षा सोमवंशी यांनी केले.

**बातमी नं. २**

जळगाव (प्रतिनिधी) दि. २६ : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ येथे भारतीय मानव्य प्राच्यविद्या अध्ययन केंद्र व कला व मानव्यविद्या प्रशाळेच्या भारतीय ज्ञान परंपरा केंद्रातर्फे 'इंडियन नॉलेज सिस्टीम अँड इट्स ग्लोबल इम्पॅक्ट' या विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. ही परिषद दि. ४ व ५ मार्च रोजी विद्यापीठाच्या पर्यावरण प्रशाळेच्या सभागृहात पार पडणार आहे.

परिषदेचे उद्घाटन दि. ४ मार्च रोजी सकाळी १० वाजता होणार असून भारतीय ज्ञान परंपरेचे अभ्यासक आचार्य श्रेयस कुडेकर हे बीजभाषण करणार आहेत. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी राहणार असून प्रमुख अतिथी म्हणून प्रा. प्रकाश पाठक तसेच प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे यांची उपस्थिती लाभणार आहे.

या राष्ट्रीय परिषदेचा मुख्य उद्देश भारतीय ज्ञान परंपरेतील विविध पैलूंचा, विशेषतः ज्ञान, विज्ञान-तंत्रज्ञान, नाविन्यता आणि जागतिक विचारसरणीतील भारताच्या योगदानाचा सखोल अभ्यास करणे हा आहे. परिषदेअंतर्गत एकूण सहा तांत्रिक सत्रांचे आयोजन करण्यात आले असून देशभरातील तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत.

या राष्ट्रीय परिषदेसाठी नोंदणीची अंतिम मुदत २ मार्च २०२६ पर्यंत निश्चित करण्यात आली असून संशोधक, प्राध्यापक व विद्यार्थी यांनी https://edu.easebuzz.in/register/FAOcZgp8/iks_seminar

या लिंकवरून नोंदणी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी परिषदेच्या निमंत्रक डॉ. वीणा महाजन व सचिव डॉ. तुषार रायसिंग यांच्याशी संपर्क साधावा तसेच या परिषदेचे मुख्य निमंत्रक तथा राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य राजेंद्र नन्नवरे आणि संचालक प्रा. राम भावसार यांनी जास्तीत जास्त संशोधक व शिक्षकांनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन केले आहे.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: २६ फेब्रुवारी, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता